## नियमित दिवाणी दावा क्र.१४८/२020 मधील निशाणी क्र.७३ खाली आदेश

## (पारित दिनांक ०८ सप्टेंबर, २०२५)

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ नुसार मयत प्रतिवादी क्र.१ अहमद रमजान आत्तार यांचा दि.०८/१०/२०२४ रोजी, मु.पो. कानगाव, ता. दौंड, जि. पुणे येथे मृत्यु झाला असल्यामुळे त्यांचे वारस प्रतिवादी क्र.१अ रेश्मा सादिक अत्तार, वय – ३२ वर्ष, धंदा – घरकाम, रा. द्वारा सादिक फकीरभाई आत्तार, मु.पो. टाकवे बुद्रूक, ता. मावळ, जि. पुणे – ४१२१०६ यांना दाव्यात समाविष्ट करुन घेण्याची मागणी केली. तसेच सदर प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभीलेखावर घेतल्यास प्रतिवादींच्या बचावास कोणतीही बाधा निर्माण होत नसुन उलट न्यायदानास मदत होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

२. सदर अर्जावर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले असता प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी ७८ वर दाखल केले. प्रतिवादींचे म्हणणेनुसार सदरचा वादीचा अर्ज खरा, बरोबर, प्रामाणिकपणाचा कायदेशिर नसल्याने सदरचा अर्ज त्यांना मान्य व कबुल नाही. तसेच अर्जातील नमुद कारणे खरी नाहीत व अर्ज मेंटेनेबल नाही. दाव्याचे कामकाज लांबवण्यासाठी वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब केल्याचे नमुद केले. त्यामुळे सदरचा अर्ज तीन हजार रुपयाचा खर्च लावुन नामंजुर करण्याची विनंती केली.

३. अर्ज, म्हणणे वाचले. दोन्ही वकीलांचे म्हणणे ऐकले व कागदपत्रांचे अवलोकन केले. सदरचा दावा जाहीर ठराव व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. सदर वादीने यादी निशाणी ७६ वर दाखल मयत प्रतिवादी क्र.१ अहमद रमजान आत्तार यांचा दि.०८/१०/२०२४ रोजी मृत्यु झाल्याचे मृत्युपत्रावरुन दिसुन येते. सदर प्रकरणात प्रतिवादी क्र.१ यांचे वारसांचा सदर प्रकरणातील अचल संपत्तीमध्ये हिस्सा असल्याने त्यांचे हक्क व अधिकारावर सदर दाव्याच्या

न्यायनिर्णयाचा परिणाम होणार आहे. सदर प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता सदर प्रतिवादी क्र.१ चे वारसांना दाव्यात समाविष्ट करणे गरजेचे आहे. प्रतिवादींचा असा आक्षेप नाही की, सदर अर्जात नमुद वारस हे मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस नाहीत. प्रतिवादींनी केवळ मोघम स्वरुपाचा आक्षेप घेतला आहे. प्रकरणातील दाव्याचे स्वरुप हे अचल संपत्तीच्या संबंधाने असुन प्रकरणातील होणा–या अंतिम न्यायनिर्णयामुळे सदर अर्जातील मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारसांचे हक्क व अधिकारावर परिणाम होणार आहे. करीता, मी खालील आदेश परीत करतो –

## :: आदेश ::

१. निशाणी ७३ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीला आदेशित करण्यात येते की, अर्जातील नमुद मयत प्रतिवादी क्र.१ अहमद रमजान आत्तार यांचे वारस ''प्रतिवादी क्र.१अ) श्रीमती रेश्मा सादिक अत्तार, वय – ३२ वर्ष, धंदा – घरकाम, रा. द्वारा सादिक फकीरभाई आत्तार, मु.पो. टाकवे बुद्रूक, ता. मावळ, जि. पुणे – ४१२१०६ यांना पुढील तारखेपर्यंत अभिलेखावर घ्यावे.

३. वादीने येणेप्रमाणे दाव्यात पुढील तारखेपर्यंत दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत प्रकरणात दाखल करावी.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2025.09.09 15:09:21 +0530

ठिकाणः दौंड, **(एस.एन. पाटील)**

दिनांक ०८/०९/२०२५ २रे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, जि. पुणे

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | :: | एम.एम. चिंतले |
| न्यायालयाचे नांव | :: | एस.एन. पाटील<br>२रे सह दिवाणी न्यायाधीश, दौंड<br>ता. दौंड, जि.पुणे |
| निकाल दिनांक | :: | ०८/०९/२०२५ |
| पिठासीन अधिका–याने निकालपत्रावर सही केलेचा दिनांक | :: | ०८/०९/२०२५ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :: | ०९/०९/२०२५ |